# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः04.09.2024** **वारःबुधवार**

---

•महाराष्ट्र विधान परिषदेनं जबाबदार वरिष्ठ सभागृहाची भूमिका यशस्वीपणे बजावल्याचे राष्ट्रपतीं द्रौपदी मुर्मू यांचे गौरवोद्गार

•शैक्षणिक संस्थांनी मुलींसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करावं – राष्ट्रपतींचं आवाहन

•२७व्या राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स परिषदेचा मुंबईत प्रारंभ

•विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यातले एसटी कर्मचारी बेमुदत संपावर; प्रवाशांचे हाल

आणि

•अतिवृष्टीग्रस्तांना तातडीने मदत उपलब्ध करून देण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या प्रशासनाला सूचना

**राष्ट्रपती विधान परिषद**

महाराष्ट्र विधानपरिषदेनं विविध महत्वपूर्ण निर्णय आणि कायदे करण्याबरोबरच लोकांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्याचं काम केलं आहे; एका जबाबदार वरिष्ठ सभागृहाची भूमिका यशस्वीपणे बजावत, देशाच्या संसदीय प्रणालीत विधानपरिषदेनं स्वतःची ओळख निर्माण केली आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रपतीं द्रौपदी मुर्मू यांनी काढले. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शताब्दी सोहळ्याला संबोधित करताना त्या काल मुंबईत बोलत होत्या. राष्ट्रपतींनी आपल्या भाषणाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करून केली. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

‘वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व’; या ग्रंथाचं प्रकाशनही यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते झालं. तसंच ‘उत्कृष्ट संसदपटू’ आणि ‘ उत्कृष्ट भाषण’ पुरस्कारांचं वितरणही त्यांच्या हस्ते करण्यात आलं. महाराष्ट्र विधान परिषदेचं,

राज्याच्या विकासकार्यात मोठं योगदान असल्याचं यावेळी राज्यपाल सी पी राधाकृष्णन म्हणाले. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या भाषणातून विधिमंडळाच्या गौरवशाली परंपरेचा उल्लेख केला.

तत्पूर्वी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल दादर इथल्या चैत्यभूमीला भेट देऊन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**<u>राष्ट्रपती पुणे</u>**

सर्व शैक्षणिक संस्थांनी मुलींसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करावं असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल पुण्यात केलं. सिम्बायोसिस विद्यापीठाच्या २१व्या दीक्षांत समारंभात त्या बोलत होत्या. ज्ञानामध्ये जगात सकारात्मक बदल घडवण्याची क्षमता असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी समाजातील विविध घटकांच्या गरजा समजून घेऊन विकासात योगदान द्यावं, स्वतःच्या पुढे जाऊन समाजाचा विचार करावा असं आवाहन राष्ट्रपतींनी केलं. दीक्षांत समारंभात 11 सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांपैकी 8 मुली होत्या याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. लैंगिक समानतेवर भर देऊन सर्वसमावेशक विकासासाठी विद्यापीठ करत असलेल्या प्रयत्नांचं त्यांनी कौतुक केलं. यावेळी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मंत्री चंद्रकांत पाटील आणि विद्यापीठाचे कुलपती शां. ब. मुजुमदार उपस्थित होते. या विद्यापीठात शिकत असलेल्या 85 देशांच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रपतींना आपल्या देशांचे ध्वज सादर केले.

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती आज लातूर आणि नांदेड जिल्ह्याला भेट देणार असून उदगीर इथं बुद्धविहाराचं लोकार्पण राष्ट्रपतींच्या हस्ते होणार आहे. तसंच संध्याकाळी नांदेडच्या 'तख्त श्री सचखंड हुजूर साहिब गुरुद्वारा' इथं त्या दर्शन घेणार आहेत.

**<u>ई-गव्हर्नन्स-महासंवाद</u>**

ई-गव्हर्नन्स हे फक्त तंत्रज्ञान नसून लोकांची विचार प्रवृत्ती बदलण्याचं माध्यम आहे. यामधल्या पारदर्शकतेमुळे सामान्य नागरिकांचा प्रशासनावरचा विश्वास वाढत असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. 'ई-गव्हर्नन्स' या विषयावरच्या २७व्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन करताना ते काल मुंबईत बोलत होते. 'विकसित भारत-सुरक्षित आणि शाश्वत ई-सेवा वितरण' ही या परिषदेची संकल्पना आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. ई-गव्हर्नन्स हा विकासाचा एक मूलभूत घटक असून

तो सरकारला अधिक जबाबदार, सर्वसमावेशक आणि नागरिक केंद्रित बनण्यासाठी सहायक असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' या योजनेच्या पहिल्या दोन हप्त्यांची रक्कम अतिशय कमी वेळेत थेट लाभार्थ्यांच्या खात्यात देण्यात आली; हे केवळ ई गव्हर्नन्समुळे शक्य झाल्याचं त्यांनी सांगितलं.

'ई-गव्हर्नन्स' हे सुशासनाचं मूलभूत तत्व असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स पुरस्कार 2024 विजेत्यांचा फडणवीस यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

**<u>एस टी संप</u>**

एसटी कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन मिळावं यासह अन्य मागण्यांसाठी राज्यातल्या एसटी कर्मचाऱ्यांनी कालपासून बेमुदत संप पुकारला. परिणामी पुणे, सातारा, नाशिक, सांगलीसह राज्यभरातील अनेक आगारातून एसटी बस बाहेर पडल्या नाहीत. गणेशोत्सव अवघ्या चार दिवसांवर आला असताना एस. टी. कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या या संपामुळं प्रवाशांचे मात्र हाल होत आहेत. दरम्यान मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत संप बेमुदत सुरूच ठेवण्याचा निर्णय कर्मचारी संघटनेनं घेतला आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याबरोबरची बैठक निष्फळ ठरली आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत आज बुधवारी बैठक घेऊन चर्चेतून मार्ग काढू, कर्मचाऱ्यांनी संप करु नये, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं आहे.

**<u>आवलगावकर कुलगुरू</u>**

मराठी भाषेतील पहिला गद्य ग्रंथ आणि काव्य ग्रंथ जिथे निर्माण झाला त्या अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर इथं मराठी भाषा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. या विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून ज्येष्ठ समीक्षक, वाङ्मय इतिहासाचे आणि महानुभाव साहित्याचे व्यासंगी अभ्यासक डॉक्टर अविनाश आवलगावकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या विद्यापीठाचं कामकाज आणि प्राधान्यक्रम याविषयी 'आकाशवाणी'ला माहिती देताना डॉक्टर आवलगावकर म्हणाले...

**<u>तान्हा पोळा-मारबत</u>**

तान्हा पोळ्याचा सण काल विदर्भातील विविध जिल्ह्यात उत्साहानं साजरा झाला. त्यानिमित्त विविध मंदिरं, मैदानं या ठिकाणी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. तान्ह्या पोळ्याच्या दिवशी निघणारी, विदर्भाचं सांस्कृतिक वैभव असलेली नागपुरातील काळी -पिवळी मारबत मिरवणूक पारंपरिक पद्धतीनं निघाली. यंदा चिकनगुनिया, डेंग्यू, रस्त्यावरील खड्डे, महिलांवरील अत्याचार आणि भ्रष्टाचारा सोबतच महागाई, वाढती बेरोजगारी या विषयांवरील बडग्यांनी नागरिकांचं लक्ष्य वेधलं. गोंदिया, अमरावतीमध्ये तसंच हिंगोली जिल्ह्यातील वाई गोरक्षनाथ इथंही काल पोळा सण साजरा करण्यात आला.

**पोळा दुर्घटना**

दरम्यान पोळ्याच्या सणासाठी बैल धुण्याकरता नदीवर गेलेल्या बुलडाणा जिल्ह्यातील हरणखेड इथल्या 3 युवकांचा पाण्यात बुडून काल मृत्यू झाला.

**सिंधुदुर्ग पुतळा**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण मधील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा गेल्या आठवड्यात कोसळला. या प्रकरणी प्रमुख संशयित आरोपी असलेला शिल्पकार जयदीप आपटे फरार असून अद्यापही त्याचा शोध लागलेला नाही त्यामुळं पोलिसांनी त्याच्याविरुद्ध लुक आऊट नोटिस जारी केली आहे. या प्रकरणातील दुसरा आरोपी चेतन पाटील याला अटक करण्यात आली आहे.

**जल जन्यआजार**

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा राज्यात पाऊस जास्त झाल्यानं कॉलरा, गॅस्ट्रो, कावीळ, अतिसार यासारख्या जलजन्य आजारांचे रुग्ण वाढले आहेत. या आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आरोग्य विभाग उपाययोजना करत असून सर्वाधिक प्रादुर्भाव होण्याची शक्यता असलेल्या गावांची यादीही तयार करण्यात येत आहे. यंदा जानेवारी ते ऑगस्ट या कालावधीत जलजन्य आजारांमुळे राज्यात १० रुग्ण दगावल्याचं आरोग्य विभागाच्या अहवालातून समोर आलं आहे.

**विदर्भ पाऊस**

मराठवाडा आणि विदर्भातील विविध जिल्ह्यात सध्या जोरदार पाऊस सुरू असून अनेक जिल्ह्यांमध्ये पुरामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. हिंगोली जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून पाऊस सुरू असून अंदाजे 3 लाख हेक्टरवरील शेतीच नुकसान झालं आहे. या नुकसांनीचे तातडीनं पंचनामे करण्याचे आदेश सर्व तहसीलदारांना देण्यात आले आहेत. दरम्यान टेंभूर्णी इथल्या एका युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला असून पारवा इथे एक जण वीज पडून जखमी झाला आहे. सारंगवाडी इथं नाल्याच्या पाण्यात वाहून गेल्यानं एका लहान मुलीचा मृत्यू झाला. या पावसामुळे 100 पेक्षा जास्त जनावरं दगावली आहेत. हिंगोली जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी काल अतिवृष्टी झालेल्या भागांची पाहणी करून आढावा बैठक घेतली आणि प्रशासनाला सूचना दिल्या.

परभणी जिल्ह्यात 3 दिवसांपासून सुरू असलेल्या पावसानं काल थोडी उघडीप दिली असली तरी जिल्ह्यातील धरणं पूर्ण क्षमतेनं भरली आहेत. जिंतुर तालुक्यातील करपरा नदीला आलेल्या पूरामुळं आसपासच्या गावांचा संपर्क तुटला आहे.

नांदेड, जालना, बुलडाणा जिल्ह्यातही मुसळधार पाऊस झाला असून धरणांची पाणी पातळी वाढली आहे.

दरम्यान राज्यातल्या विविध जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे आणि मदतीची कार्यवाही त्वरित करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत.

नुकसानीचे त्वरित पंचनामे करावेत, अतिवृष्टीमुळे तात्पुरते स्थलांतर केलेल्या लोकांना सर्व आवश्यक सुविधा आणि मदत उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी  दिल्या आहेत.

**हवामान**

विदर्भात वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. अन्यत्र हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

# याबरोबरच हे प्रादेशिक बातमीपत्र संपलं,नमस्कार